सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**५ बी. जे. रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१**

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२ २८४६/४७, Email :- comm_audit@rediffmail.com

---

जा.क्र. स.आ./लेखापरीक्षण/१९(१)/पतसंस्था/ले.प.अहवाल मसुदा/ ४०७ /२०२२, दि.०४ /०४/२०२२

**राज्यातील ग्रामिण व नागरी सहकारी पतसंस्थांकरीता वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा.**

## -: परिपत्रक :-

९७ व्या घटना दुरुस्तीनंतर राज्याच्या सहकार कायद्यात काही महत्वाचे बदल करण्यात आलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(१) नुसार प्रत्येक संस्थेने आपले आर्थिक वर्ष संपल्यानंतर चार महिन्यांचे आत आपल्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन घ्यावयाचे आहे आणि सहा महिन्यांचे आत असा लेखापरीक्षण अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांसमोर सादर करावयाचा आहे. कलम ७५(२अ) अन्वये प्रत्येक सहकारी संस्थेने कलम ८१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामतालिकेवरील किमान पात्रता व अनुभव असणा-या लेखापरीक्षकाची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करावयाची आहे. अशा नेमणूक केलेल्या लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण पुर्ण केल्यानंतर अधिनियमातील तरतुदींनुसार आपला वैधानिक लेखापरीक्षण अहवाल संस्थेस व निबंधकास सादर करावयाचा आहे.

सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालाची रचना मुद्देसुद व सुटसुटीत असावी या करीता दि.१९.०५.१९९७ रोजीच्या परिपत्रकान्वये या कार्यालयाने यापुर्वी सुचना दिलेल्या आहेत. तथापी या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील नागरी व ग्रामिण पतसंस्थांचे लेखापरीक्षण अहवाल लिहिताना संबंधित लेखापरीक्षकाकडून संस्थेच्या आर्थिक स्थितीचे अत्यंत त्रोटक व संदिग्ध पद्धतीने विवेचन केले जाते. तसेच सदरचे लेखापरीक्षण अहवाल या कार्यालयाने दिलेल्या परिपत्रकीय सुचना, अधिनियम व नियम इत्यादी बाबींना अनुसरुन सादर केले जात नसल्याचे व परिणामी लेखापरीक्षण अहवालात एकसुत्रता नसल्याचे निदर्शनास आले आहे.

राज्यातील सहकारी पतसंस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, सदर पतसंस्थामध्ये, ठेवीदार व सभासद यांचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याने व त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने या संस्थांच्या आर्थिक स्थितीचे रास्त व वास्तव चित्र लेखापरीक्षण अहवालाद्वारे सहजतेने त्यांचे निदर्शनास येणे अत्यंत महत्वाचे आहे. संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालातून संस्थेच्या आर्थिक स्थितीचे योग्य मुल्यमापन तसेच संस्थेच्या इतर अनुषंगिक सर्व बाबींची माहिती संबंधित सभासद, ठेवीदार व निबंधक यांना होणे आवश्यक आहे.

सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालाची रचना मुद्देसुद व सुटसुटीत असावी या करीता दि.१९.०५.१९९७ रोजीच्या परिपत्रकान्वये या कार्यालयाने यापुर्वी सुचना दिलेल्या आहेत. तथापी सदर सुचना पारित करुन प्रदीर्घ कालावधी झालेला आहे. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,

नियम व लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने लागु असलेले अन्य कायदे तसेच संस्थांच्या आदर्श उपविधीमध्ये देखील सदर कालावधीत अमुलाग्र सुधारणा झालेल्या आहेत. यास्तव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी नियम १९६१, पतसंस्थांचे आदर्श पोटनियम व पतसंस्थांना लागू असलेले अन्य कायदे या सर्व बाबी विचारात घेवून, राज्यातील नागरी व ग्रामिण सहकारी पतसंस्थांच्या लेखापरीक्षण अहवालांची रचना, लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करावयाचे मुद्दे, लेखापरीक्षण अहवालांतील मुद्यांचा क्रम, लेखापरीक्षण अहवालासोबत सादर करावयाची प्रपत्रे व लेखापरीक्षण अहवालाची रचना इत्यादी महत्वाच्या बाबी निश्चित करुन, आदर्श लेखापरीक्षण अहवालाचा मसुदा तयार करणे आवश्यक असल्याने या कार्यालयाचे स्तरावर समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने पतसंस्थांकरीता लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसूदा तयार केलेला असून, राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये, गुणात्मक सुधारणा घडवून आणण्याचे व एकसुत्रता आणण्याचे दृष्टीकोनातून तसेच लेखापरीक्षकाने सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवाल संबंधित नियामक प्राधिकरणांना सुगम्य होण्याचे दृष्टीने, या समितीने पतसंस्थांकरीता तयार केलेला आदर्श नमुना याद्वारे नामतालीकेवर नोंदणीकृत असलेल्या व भविष्यात नोंदणीकृत होणा-या सर्व लेखापरीक्षकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

राज्यातील सर्व नागरी व ग्रामिण सहकारी पतसंस्थांचे लेखापरीक्षण करणा-या लेखापरीक्षकांनी, सन २०२१-२२ व त्यापुढील आर्थिक वर्षांकरीता सहकारी पतसंस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करताना, सदरहू आदर्श लेखापरीक्षण अहवाल मसुद्यान्वये विहित केल्यानुसारच सहकारी पतसंस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची संरचना करावी. सदर मसुदा अहवालामध्ये ज्या क्रमाने जे मुद्दे नमुद केलेले आहेत त्याच क्रमाने लेखापरीक्षण अहवालात मुद्दे नमुद करावेत. तसेच लेखापरीक्षण करताना आदर्श मसुद्यात नमुद मुद्यांव्यतिरीक्त काही मुद्दे निदर्शनास आल्यास असे मुद्दे व त्यावरील आक्षेप / अभिप्राय लेखापरीक्षण अहवालाच्या योग्य त्या भागात नमुद करण्यात यावेत. सदर आदर्श मसूद्यामध्ये लेखापरीक्षण अहवालासोबत जोडावयाची जी अनुषंगीक प्रपत्रे नमुद केलेली आहेत ती सर्व प्रपत्रे त्या-त्या क्रमानेच लेखापरीक्षण अहवालासोबत जोडण्याची दक्षता घ्यावी. सर्व लेखापरीक्षकांनी सदर परिपत्रकीय सुचनांचे तंतोतंत पालन करणे अनिवार्य आहे. सदर परिपत्रक https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

नागरी व ग्रामिण सहकारी पतसंस्था वगळता राज्यातील अन्य प्रकारच्या सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालांच्या रचनेबाबत या कार्यालयाच्या दि.१९.०५.१९९७ रोजीच्या परिपत्रकान्वये यापूर्वी दिलेल्या सूचना कायम ठेवण्यात येत आहेत.

**सोबत** - नागरी व ग्रामिण सहकारी पतसंस्थांकरीता आदर्श
वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा मसुदा
(पृष्ठ क्र. १ ते ५१)

**(अनिल कवडे)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत - माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१) अपर निबंधक, सहकारी संस्था, (पतसंस्था), मुख्यालय,पुणे.
२) अपर निबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), मुख्यालय, पुणे.
३) कार्यासन अधिकारी, सं.व.का. शाखा, मुख्यालय, पुणे.
४) विभागिय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन व लेखापरीक्षण) सर्व

५) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
६) जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था वर्ग - १ (सर्व)
७) इन्स्टीट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडीया, WIRC, बि.के.सी., बांद्रा, मुंबई ४०००५१.
८) इन्स्टीट्युट ऑफ कॉस्ट ॲन्ड वर्क्स अकाउंटट्स ऑफ इंडीया, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई.
९) अध्यक्ष/सचिव, ऑडीटर्स कौन्सिल ॲन्ड वेलफेअर असोसिएशन, पुणे.(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना.
१०)प्रमाणित लेखापरीक्षकांच्या सर्व जिल्हास्तरीय संघटना.
११) निवड नस्ती.

**प्रत - माहितीस्तव**

**मा.अपर मुख्य सचिव (सहकार व पणन) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.**

श्री/श्रीमती. --------------------------,----
------------ लेखा परीक्षक,
नामतालिका क्र. -----,
नामतालिका वर्गवारी ---
कार्यालयाचा पत्ता--
ई-मेल------- फ़ोन नंबर-
जा.क्र. ---दिनांक---------

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव,
----------------- सहकारी संस्था मर्या. ---------------

**विषय:-** ----------------------------- संस्थेचा सन -------------- चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल
**संदर्भ:-** लेखापरीक्षक नियुक्तीचा संस्थेचा ठराव क्र. ----- दि. --------, किंवा मा. ------ निबंधक, ------ कार्यालयाचे परंतुकान्वये लेखा परीक्षक नियुक्तीचे आदेश क्र. ---------- दि. ----------

वरील विषय व संदर्भास अनुसरुन,

आम्ही ----------------------------- संस्थेचे दि.१/०४/२०-- ते ३१/०३/२०--- या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण केलेले असुन, यासोबत वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यात येत आहे. या वैधानिक लेखापरीक्षण अहवालात नमुद केलेल्या सर्व दोषांची पुर्तता करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ८२ व नियम ७३ नुसार दोष दुरुस्ती अहवाल, विहित "ओ" नमुन्यात, ३ प्रतींत संचालक मंडळ सभा मंजुरी ठराव प्रतीसह विहीत मुदतीत आम्हास सादर करावा.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ८२ मधील तरतुदीनुसार, संस्था संपुर्ण दोषांची दुरुस्ती करेपर्यंत, संस्थेच्या दुरुस्ती अहवालवर आमचे बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाला आमचा अहवाल सादर करण्याची जबाबदारी आमची असल्याने अहवालातील नमुद सर्व दोषांची प्रत्यक्षात पुर्तता करुन, दोष दुरुस्ती अहवाल सादर करण्याची दक्षता घ्यावी. आपण ज्या दोषांची पुर्तता प्रत्यक्षात करणार नाहीत असे दोष अमान्य करुन पुर्ततेस्तव पुनश्चः कळविण्यात येतील, तसेच संपुर्ण दोषांची समाधानकारक व प्रत्यक्ष पुर्तता झाल्यानंतरच **"दोषदुरुस्ती अहवालाच्या अनुषंगाने सर्व दोष निरंक झाल्याबाबतचे प्रमाणपत्र"** संस्थेस व निबंधकांना सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सोबत:-** लेखापरीक्षण अहवाल: पृष्ठे १ ते ----

(लेखा परीक्षकाचे नांव)
सनदी/ प्रलेप/शासकीय
नामतालिका क्र. -----, जिल्हा ----

प्रत सादर -

१) मा. ----------- निबंधक, ------------
२) मा. जिल्हा विशेष लेखा परीक्षक, वर्ग – १, सहकारी संस्था -------
३)मा.सहनिबंधक(ले.प.),राज्यस्तरीय लेखासमिती,पुणे(वसुल भागभांडवल रु.५लाखापेक्षा जास्त असल्यास)
४) ------------------- बँक (संस्थेने कर्ज घेतले असल्यास)

(लेखा परीक्षकाचे नांव)
सनदी/ प्रलेप/शासकीय
नामतालिका क्र. -----, जिल्हा ----

# अनुक्रमणिका



| क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १ | लेखापरीक्षक नियुक्तीचा ठराव / परंतुकाचे आदेश व लेखापरिक्षण शुल्क आकारणी माहिती | ---- ते ---- |
| २ | सारांश अहवाल (Executive Summery) | ---- ते ---- |
| ३ | नमुनाः- १ चे सर्वसाधारण शेरे व माहिती | ---- ते ---- |
| ४ | नमुनाः- ८ चे सर्वसाधारण शेरे व माहिती | ---- ते ---- |
| ५ | कलम ८१ (२) नुसार १ ते ९ मुद्दांवर द्यावयाचे शेरे | |
| ६ | विभाग "अ" | ---- ते ---- |
| | अ) गैरव्यवहार, अफरातफर, फसवणुक, बनावट कागदपत्रांव्दारे लेखापरीक्षणात निदर्शनास आलेला अपहार:- | ---- ते ---- |
| | ब) लेखापरीक्षणात निदर्शनास आलेल्या आर्थिक नुकसानीबाबत:- | ---- ते ---- |
| | क) अन्य महत्वाच्या व गंभीर बाबी ज्या निबंधकाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. | ---- ते ---- |
| ७ | विभाग "ब" | ---- ते ---- |
| | अ) व्यवस्थापन विभाग | |
| | १. संस्था नोंदणी | ---- ते ---- |
| | २. संस्था कार्यक्षेत्र | ---- ते ---- |
| | ३. संस्थेचे मुख्य कार्यालय व शाखा | ---- ते ---- |
| | ४. संस्थेचे उददेश | ---- ते ---- |
| | ५. सभासदत्व | ---- ते ---- |
| | ६ सभा कामकाज | ---- ते ---- |
| | ७. संस्थेचे संचालक मंडळ निवडणूक कालावधी | ---- ते ---- |
| | ८. अतंर्गत नियंत्रण | ---- ते ---- |
| | १) सेवक कामकाज | ---- ते ---- |
| | २) शाखा अंतर्गत व्यवहार | ---- ते ---- |
| | ३) विविध लेखापरीक्षण व अन्य तपासण्या | ---- ते ---- |
| | ९) कायदा, नियम व पोटनियमाचे उल्लंघन | ---- ते ---- |
| | १०) स्वनिधि व भागाचे नक्त मुल्य | ---- ते ---- |
| | ११) रोख तरलता निधिचे प्रमाण | ---- ते ---- |
| | १२) वैधानिक तरलता निधिचे प्रमाण | ---- ते ---- |
| | १३) बाहेरील कर्ज उभारणी मर्यादा | ---- ते ---- |
| | १४) कर्ज व ठेवीवरील व्याजदर | ---- ते ---- |
| | १५) कर्ज व ठेवीवरील व्याजाचा दुरावा | ---- ते ---- |
| | १६) कलम ७९ अन्वये सादर केलेली विवरणपत्रे | ---- ते ---- |
| | १७) महत्वाची हिशोबी धोरणे | ---- ते ---- |
| | १८) संस्थेच्या नावे किंवा संस्थेच्या विरुध्द दाखल असलेली कायदेशिर प्रकरणे | ---- ते ---- |
| | १९) सभासद के.वाय.सी. पुर्ततेबाबत | ---- ते ---- |
| | २०) सोने मुल्यांकनकार करार | ---- ते ---- |
| | २१) पतसंस्था नियामक मंडळ कामकाज / उल्लंघनाच्या बाबी | |
| | २२) संस्थेच्या उपविधी दुरुस्तीबाबत. | |

| | | |
|---|---|---|
| | २३) संस्था विमा | ---- ते ---- |
| | **ब) आर्थिक पत्रके विवेचन** | ---- ते ---- |
| | १) ताळेबंद विवेचन | ---- ते ---- |
| | २) **नफा-तोटा पत्रक** | ---- ते ---- |
| | क) आर्थिक प्रमाणके | ---- ते ---- |
| | ड) संस्था ठेवी व कर्जे व्यवहार | ---- ते ---- |
| | अ) ठेव व्यवहार | ---- ते ---- |
| | १. ठेवींची तुलनात्मक आकडेवारी | ---- ते ---- |
| | २. अल्प मुदत व दिर्घ मुदत ठेवी | ---- ते ---- |
| | ३. कालनिहाय ठेव परिपक्कवता विगतवारी | ---- ते ---- |
| | ४. ठेवींवर दिला जाणारा व्याजदर | ---- ते ---- |
| | ५. नाममात्र सभासद ठेवी | ---- ते ---- |
| | ६. दैनंदिनी ठेवीबाबत | ---- ते ---- |
| | ब) कर्ज व्यवहार | ---- ते ---- |
| | १ कर्जाची तपासणी | ---- ते ---- |
| | २. वैयक्तिक व समूह महत्तम कर्ज मर्यादा | ---- ते ---- |
| | ३. विनातारणी कर्ज मर्यादा | ---- ते ---- |
| | ४. पत-ठेवी प्रमाण (सी डी रेशो ) | ---- ते ---- |
| | ५.दि.३१/०३/२०२- अखेर येणे कर्ज | ---- ते ---- |
| | ६. कर्जाची कालनिहाय विगतवारी | ---- ते ---- |
| | ७. तारणी विनातारणी कर्जे | ---- ते ---- |
| | ८. थकबाकी | ---- ते ---- |
| | १. थकबाकी रक्कम | ---- ते ---- |
| | २. शाखानिहाय थकबाकी पुढीलप्रमाणे | ---- ते ---- |
| | ३ कालनिहाय थकबाकी पुढीलप्रमाणे | ---- ते ---- |
| | ४ प्रभावशाली थकबाकिदार (२५ मोठे थकबाकीदार) | ---- ते ---- |
| | ५ थकबाकीदारांवरील केलेली कारवाई | ---- ते ---- |
| | ६ थकित येणे व्याज | ---- ते ---- |
| | ७. बुडीत कर्जे जमा खर्चातून काढून टाकणे | ---- ते ---- |
| | ८. एकरकमी कर्ज परतफेड योजना | ---- ते ---- |
| | ९ अनुत्पादित जिंदगी | ---- ते ---- |
| | १० एन.पी.ए. प्रमाण | ---- ते ---- |
| | ११. संचालक व संचालक नातेवाईक कर्ज | ---- ते ---- |
| | | ---- ते ---- |
| ८ | विभाग "क" | ---- ते ---- |
| ९ | लेखापरीक्षक प्रमाणपत्र नमुना "एन - २" | ---- ते ---- |
| १० | नियम ६९ (६) नुसारची परीशिष्टे १ ते ५ | ---- ते ---- |
| ११ | लेखापरीक्षण वर्गवारी गुणपत्रक | ---- ते ---- |
| १२ | प्रमाणित ताळेबंद पत्रक व नफा -तोटा पत्रक (पदाधिकारी, वेधानिक लेखापरीक्षकाच्या सही शिक्क्यासह) | ---- ते ---- |

| | | |
|---|---|---|
| १३ | बँक बाकी पत्रे व बँक ताळमेळ पत्रके | ---- ते ---- |
| १४ | रोख शिल्लक प्रमाण पत्रे | ---- ते ---- |
| १५ | शाखा व मुख्यालय जुळवणी पत्रक | ---- ते ---- |
| १६ | जंगम मालमत्ता यादी | ---- ते ---- |
| १७ | अचल मालमत्ता यादी | ---- ते ---- |
| १८ | वसुल भाग भांडवल यादी / सारांश पत्रक (Summery Report) | ---- ते ---- |
| १९ | ठेव यादी / सारांश पत्रक (Summery Report) | ---- ते ---- |
| २० | कर्जे यादी / सारांश पत्रक (Summery Report) | ---- ते ---- |
| २१ | इतर येणी यादी / सारांश पत्रक (Summery Report) | ---- ते ---- |
| २२ | इतर देणी याद्या / सारांश पत्रक | ---- ते ---- |
| २३ | संचालक, त्यांचे कुटुंबिय वा त्यांच्या कंपन्यांना वितरीत येणे / थकीत कर्जाची यादी. | ---- ते ---- |
| २४ | संचालक ठेव यादी | ---- ते ---- |
| २५ | संस्था कर्मचारी यादी | ---- ते ---- |
| २६ | इतर आवश्यक कागदपत्रे | ---- ते ---- |

# लेखापरिक्षण अहवालातील ठळक बाबींचा गोषवारा

( Executive Summary Report )

**अ) प्राथमिक माहिती**

१. संस्थेचे नांव व पत्ता :-

२. नोंदणी क्रमांक :-

३. कार्यक्षेत्र :-

४. चालू लेखापरिक्षणाचा कालावधी :-

५. लेखापरिक्षकाचे नांव आणि नांमतालिकेवरील नोंदणी क्रमांक :-

६. लेखापरिक्षकाची नांमतालिकेवरील वर्गवारी :-

७. लेखापरिक्षक नियुक्ती ठरावाने किंवा परंतुका आदेशाने आणि त्याबाबतचा तपशिल :-

८. लेखापरिक्षण वर्गवारी :-

९. लेखापरिक्षण अहवाल सादर दिनांक :-

१०. विशेष अहवाल / विनिर्दिष्ट अहवाल सादर करणार आहात काय :-

११. संस्थेचे अनिवार्य विवरणपत्र ( Mandatory Returns) दाखल अपलोड केल्याचा दिनांक :-

१२. मागील लेखापरिक्षण दोष दुरुस्ती सादर दिनांक / दोष दुरुस्ती मंजुरी सभा दिनांक / ठराव क्रमांक

**ब) संस्थेची सांपत्तिक स्थिती**

| अ. क्र. | तपशिल | मागील लेप वर्ष | चालू लेप वर्ष | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| **अ)** | **भांडवल व देणी** | | | |
| १) | वसुल भाग भांडवल | | | |
| २) | राखीव निधी | | | |
| ३) | इतर सर्व निधी | | | |
| ४) | ठेवी | | | |
| ५) | कर्ज | | | |
| ६) | इतर देणी | | | |
| | एकूण | | | |
| **ब)** | **जिंदगी व येणी** | | | |
| १) | रोख / बँक शिल्लक | | | |
| २) | गुंतवणूक | | | |
| ३) | जंगम मालमत्ता / शिल्लक साठा | | | |
| ४) | येणे कर्ज | | | |
| ५) | इतर येणी | | | |
| ६) | स्थावर मालमत्ता | | | |
| ७) | संचित नफा / तोटा | | | |
| ८) | चालू नफा / तोटा | | | |
| | एकूण | | | |

**क) लेखापरीक्षकाच्या निष्कर्षानुसार नमूद करावयाचे मूद्दे-**

| अ. क्र. | तपशिल | संस्थेचे आर्थिक पत्रकानूसार | लेखापरीक्षकाच्या निष्कर्षानुसार | फ़रक |
|---|---|---|---|---|
| १ | स्वनिधी (नेटवर्थ) | | | |
| २ | भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) | | | |
| ३ | कर्ज / ठेवी प्रमाण ( CD Ratio) | | | |
| ४ | थकीत कर्ज प्रमाण (%) | | | |
| ५ | ढोबळ एन. पी. ए. (%) | | | |
| ६ | निव्वळ एन. पी. ए. (%) | | | |

**ड) संस्थेच्या कामकाजातील महत्त्वाच्या / गंभीर बाबींची माहिती**

१) गैरव्यवहार, अफरातफर, फसवणुक, बनावट कागदपत्रांव्दारे निदर्शनास आलेला अपहार:- (असल्यास)

| क्र. | गुन्ह्याचा संक्षिप्त तपशिल | गुन्ह्याचा कालावधी | रक्कम रु | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| | | एकुण | रु. | |

याबाबतचा सविस्तर तपशिल ह्या अहवालाच्या भाग - "अ" मध्ये नमुद केलेला आहे.

**२) संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत :-**

सहकार कायदा / नियम व संस्था मंजुर उपविधी तरतुदींचे उल्लंघन केल्याने लेखापरीक्षणात निदर्शनास आलेल्या आर्थिक नुकसानीबाबतचा संक्षिप्त तपशील खालिल प्रमाणे

| क्र. | आर्थिक नुकसान मुद्यांचा संक्षिप्त तपशिल | आर्थिक नुकसानीची रक्कम |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| | | एकुण |

याबाबतचा सविस्तर तपशिल ह्या अहवालाच्या भाग - "अ" मध्ये नमुद केलेला आहे.

३) संचालक मंडळातील सदस्य त्यांचे पदावर राहण्यास अनर्ह (अपात्र) ठरत असल्यास ( त्याबाबतचा तपशील

**इ) लेखापरिक्षकाच्या मते संस्था करत असलेल्या उल्लेखनीय व चांगल्या बाबी -**

**अहवालाचा सारांश**

**अ .संस्थेने केलेली उत्कृष्ट कामे -**

१. संस्थेचे मुख्य कार्यालयाची जागा स्वमालकीची आहे.
२. संस्थेचे कर्मचारी व संचालक हे प्रशिक्षित आहेत.
३. संस्थेने दैनंदिन तरलता व रोखता राखलेली आहे.
४. संस्थेने न±यातुन २५% रक्कम राखीव निधीला वर्ग केली आहे.
५. संस्थेने उत्तम जिंदगीपोटी ०.२५% रक्कमेची तरतुद केली आहे.
६. वार्षिक सर्वसाधारण सभा तरतुदीनुसार घेतलेली आहे.
७. संचालक मंडळाची सभा दरमहा घेतलेली आहे.
८. अंतर्गत नियंत्रण व्यवस्था समाधानकारक आहे.

९. रोखशिल्लक, कॅश इन ट्रान्झीट, मालमत्ता इ.चा विमा उतरविला आहे.
१०. संस्थेने अंतर्गत लेखापरीक्षण करुन घेतले आहे.
११. संस्थेची दायित्वे नियक ३५ च्या मर्यादेत आहेत.

**ब. संस्थेने करावयाच्या आवश्यक व उपयुक्त बाबी -**

१. क्रियाशील व अक्रीयाशील सभासदांची यादी तयार करण्यात यावी.

२. संचालक मंडळाने वर्षाअखेर डेडस्टॉक मालाची तपासणी करुन सुस्थितीत आहे किंवा नाही याबाबतचा दाखला देणे.

३. निधी निर्मिती व विनीयोगाबाबत नियक तयार करुन त्यास वार्षिक सभेची मंजुरी घेणे.

४.उपविधीतील कर्ज विषयक नियम १६ अन्वये कर्ज विनियोग दाखले घेण्यात यावे.

५. संगणक प्रणालीचे सिस्टिम ऑडीट करुन 'Öêêण्यात यावे.

६. संचालक मंडळात २ तज्ञ संचालकांची नेमणूक करण्यात यावी.

७. कार्यक्षेत्रातील सभासदांशीच आर्थिक व्यवहार करावेत.

८. सीडीरेशोचे दक्षता प्रमाण राखण्यात यावे.

९. भाडेकरार, सोने मुल्यांकनकार करार नुतनीकरण करणे.

१०. एनपीए प्रमाण कमी करण्यासाठी उचित कारवाई करण्यात यावी.

**क. संस्था करीत असलेले चुकीचे कामे व व्यवहार -(२७.०२.२०१८ चा शासन निर्णय पाहणे)**

१. कायदा कलम ७० नियम ५४ व ५५ अन्वये निधींच्या संपुर्ण रकमेची स्वतंत्र गुंतवणूक केलेली नाही.

२. कार्यालयीन भाडेकरारनामे नोंदणीकृत केलेली नाहीत

३. गुंतवणूक करतांना उपविधीत नमुद केल्याप्रमाणे जिल्हा/ राज्य सहकारी बँक वगळता अन्य मान्यताप्राप्त कोणत्याही एका ठिकाणी ती करावयाची असल्यास संस्थेच्या लगतच्या वर्षाखेरीस एकुण ठेवीच्या ५% पेक्षा जास्त असणार नाही. याप्रमणे गुंतवणूक करावी.

४. वैयक्तिक व समुह महत्तम कर्ज मर्यादा उल्लंघन केलेले आहे.

५. सीसी कर्ज खात्याचे परीक्षण करता नियमीत व्यवहार होत नाहीत कर्जाची एकरकमी रोखीने उचल झालेली दिसुन येते. मंजुरी पेक्षा जादाची उचल विनातारणी अदा केली जाते.

६. काही बिगरसभासदांकडुन ठेवीच्या रक्कमा स्विकारल्या आहेत.

७. बिगरसभासदांना कर्ज वाटप केलेले आहे.

८. नियमबाहयपणे बुडीत कर्जे जमाखर्चातुन काढुन टाकले आहेत.

९. मा.महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचेकडील व्याजदराबाबतच्या परिपत्रकीय सुचनांचे उल्लंघन करुन कर्जव्याजदर आकारणी केली आहे.

१०. कर्जावरील वसूल न झालेले व्याज उत्पन्नात घेतले जाते

(वरील मुददेशिवाय लेखापरीक्षणाचेवेळी दिसुन आलेल्या बाबीचा उल्लेख करण्यात यावा.)

३. वरील प्रमाणे सर्व माहिती माझ्या लेखापरिक्षणानुसार सत्य व बरोबर आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी कायदा नियम ६९ मधील तरतुदीनुसार संस्थेचा लेखापरिक्षण अहवाल मी "www.mahasahakar.maharashtra.gov.in" या संकेत स्थळावर देखील अपलोड केलेला आहे.

( सही )

स्थळ :- लेखापरिक्षकाचे नाव व पदनाम

दिनांक :- नामतालिका क्रमांक --- वर्गवारी---

## नमुना क्रमांक - १
## लेखापरीक्षा अहवाल ( सर्व सहकारी संस्थासाठी )
## विभाग - पहिला

---

**संस्थेचे नाव :-** ------------------------------------------------------------------------

नोंदविलेला संपूर्ण पत्ता :- --------------------------------

---------------------------------------------------------

तालुका वा गट :- ----------------

जिल्हा - ----------

संस्था नोंदणी क्रमाक - संस्था नोंदणी दिनांक -

संस्थेचे कार्यक्षेत्र - :-

संस्थेच्या शाखा, दुकाने, आगारे ( डेपो ) यांची संख्या.- :-

लेखापरिक्षण वर्ग: - मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षण वर्ग :- ----------------

**(१) लेखापरिक्षण विषयक माहीती.**

१) लेखापरीक्षण करणा-या लेखापरिक्षकाचे संपूर्ण नाव :-

पदनाम :-

मुख्यालय :-

२) लेखापरिक्षणात समावेश करण्यात आलेला कालावधी :-

३) दिनांक -

१) लेखापरीक्षण सुरू दिनांक

२) लेखापरीक्षण संपविल्याचा

३) लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याचा

**(२) सभासदत्व.**

१) सभासद संख्या.

१) सर्वसाधारण.

२) नाममात्र.

३) हितचिंतक.

ब) संस्था:-

क) अन्य ( अन्य सदस्यांची तपशिलवार माहीती द्यावी.)

२) नवे सभासद यथोचितरित्या करून घेतले आहेत काय ?
व त्यांनी प्रवेश शुल्क दिले आहे काय?

३) त्याचे लेखी अर्ज घेण्यात आले असून ते योग्यरित्या नियतक्रमीत केले आहेत काय?

४) महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या १९६० च्या कानूतील नियम ३२ आणि ६५ (१) अन्वये ठरविलेल्या आय या नमुण्यात सभासदांची नोंदवही ठेवण्यात आली आहे काय?

५) महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या १९६० च्या कानूतील नियम ३३

अन्वये जे नमुन्यात सभासदांची यादी ठेवली आहे काय?

६) मृत,काढून टाकलेल्या वा राजीनामा दिलेल्या सभासदांच्या बाबतीत त्यांच्या नावापुढे वरील प्रमाणे योग्य ती नोंद केली आहे काय?

७) राजीनामे रितसर आहेत काय? आणि यथोचितरित्या स्विकारले आहेत काय?

८) महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या १९६० च्या कानूतील नियम ५२ प्रमाणे वारस ( नॉमिनी ) नेमून दिले आहेत काय? आणि त्याची नोंद २६ व्या नियमाप्रमाणे सभासदांच्या नोंदवहीत यथोचितरित्या केली आहे काय?

**( ३ ) भाग.**

१) भागा करीता आलेले अर्ज बरोबर आहेत काय?

२) भागांची नोंदवही अद्यावत लिहीलेली आहे काय?

३) भागांच्या नोंदवहयातील नोंदी किर्दीतील नोंदीशी जुळतात काय?

४) भागांची खतावणी अद्यावत लिहीलेली आहे काय?

५) भागांची एकूण खतावणी बाकी ताळेबंदातील भागभांडवलाच्या - आकडयाशीं जुळते काय ?

६) भागधारकांना त्यांनी घेतलेल्या सर्व भागांबद्यल भागपत्रे दिली आहेत काय?

७) भांगाचे हस्तांतरण ( ट्रांसफर ) अगर त्यांची किंमत परत देणे या गोष्टी कायदा कानू व पोटनियम यातील तरतुदी प्रमाणे झाल्या आहेत काय?

**(४) बाहेरील कर्जे.**

१)) पोटनियमाप्रमाणे संस्थेने कर्ज घेण्याची मर्यादा काय ठरविलेली आहे ?

२) ती उंल्लघिली आहे काय?

३) ती उंल्लघिली गेली असेल तर सक्षम अधिका-याकडून आवश्यकती अनुज्ञा मिळवीली आहे काय?

**(५) सभा.**

दिनांक द्यावेत.

१) अ) वार्षीक साधारण सभा.

ब) विशेष साधारण सभा.

२) लेखापरीक्षा कालावधीत भरलेल्या सभांची खालील प्रमाणे संख्या द्यावी.-

अ) व्यवस्थापक समितीच्या वा संचालक मंडळाच्या सभा

ब) कार्यकारी वा उपसमिती सभा.

क) अन्य सभा.

**(६) दोष दुरूस्ती अहवाल.**

१) संस्थने गेल्या लेखापरीक्षा अहवालाचे दोष दुरूस्ती अहवाल पाठविले आहेत काय? असल्यास ते दिल्याचे दिनांक द्या. नसल्यास ते न दिल्याबद्यलची कारणे द्या.

२) मागील लेखापरीक्षण अहवालात नमुद केलेल्या काही महत्वाच्या मुद्याकडे संस्थेने दुर्लक्ष केलेले आहे काय? तसे असेल तर सर्वसाधारण अभिप्राय नमुद करा.

**(७) लेखापरीक्षा शुल्क.**

१) शेवटच्या लेखापरीक्षा शुल्काची आकारणी रक्कम द्या. कोणत्या कालावधीसाठी आकारले तो कालावधी लिहा. लेखापरीक्षा शुल्क वसुल झाल्याचा दिनांक, कोषागाराचे नाव आणि भरलेली रक्कम द्या.

२) जर संस्थेने लेखापरीक्षा शुल्क भरले नसेल तर येणे असलेल्या लेखापरीक्षा शुल्काचा तपशील व न भरल्याची कारणे द्या.

**(८) अंतर्गत व स्थानिक लेखापरीक्षा.**

१) जर अंतर्गत वा स्थानिक लेखापरीक्षा झाली असेल तर ती कोणी अहवाल संस्थेच्या दप्तरी आहे का याची माहीती द्या.

२) सांविधानिक ( स्ट्रॅटयुटरी ) लेखापरीक्षा व अंतर्गत यांच्यात समन्वय आहे काय ? --

**(९) अ) कार्यकारी संचालक / व्यवस्थापक चिटणीस.**

१) अधिका-याचे नाव :-

२) दरमहा घतलेले वेतन :-

वेतनश्रेणी :-

३) त्यांना अन्य भत्ते आणि सवलती उदा. विनामुल्य निवासगृहे आदि उपलब्ध केल्या असल्यास त्या लिहा.

४) ते संस्थेचे सभासद आहेत काय? ते लिहा.

५) जर ते सभासद असतील तर त्यांनी कर्ज घेतले आहे काय? किंवा त्यांना उधार - उचल, सवलती दिल्या आहेत काय ? त्यांचे कडील येणे रक्कमा द्या. व त्यातील थकबाकी किती आहे,ते लिहा.

६) अन्य कोणत्या रक्कमा त्यांच्याकडून येणे असतील तर त्यांचा तपशिल द्या

७) कर्मचा-यासंबधी त्यांची नावे पदनामे, शैक्षिणीक पात्रता वेतनश्रेणी - व सध्याचे वेतन, देण्यात येणारे भत्ते, नेमणूकीचे दिनांक, मिळवा दिलेलीअनामत आदी माहीती दाखविणारी यादी

**(१०) उंल्लघन**

१) संस्थेजवळ आपले नोंदविलेले पोटनियम, कायदा व कानु यांची प्रत आहे काय ?

२)) कायदा, कानू व पोटनियम यांचे उंल्लघन झाल्याच्या नोंदी द्या.

१) कायदा कलम क्रमांक -

२) कानू क्रमांक -

३) पोटनियम क्रमांक -

३) पोटनियमांनुसार काही नियम तयार केले आहेत काय? योग्य

त्या अधिका-याकडून ते मान्य करून घेतले आहेत काय? त्याचे प्रतिपालन योग्यरितीने होत आहे काय? ( उंल्लघनासंबधी साधारण अभिप्राय थोडक्यात चर्चा करावी.)

**(११) ऊत्पन्न आणि खर्च**

१) गेल्या सहकारी वर्षात किती नफा वा तोटा झाला ?

२) निव्वळ नफयाची विभागणी कशी केली ते लिहा. ( निर्व्यवहारी - बिझनेस ) संस्थाच्या बाबतीत प्रष्नांक ११ ( २ ) च्या उत्तरात वाढ वा खोट यांच्या रक्कमा लिहाव्यात.

**(१२) रोकड रक्कमा, बँकेतील शिल्लक आणि गुंतवणूकी( सिक्युरिटीज ) -**

**अ ) रोकड जमा :-**

१) शिल्लक मोजा व कीर्दीवर शिल्लक मोजल्याचा दिनांक

२) रोकड रक्कम मोजावयास कोणी सादर केली त्याचे नाव पदनाम लिहा. रोकड रक्कम ठेवण्याबाबत त्यांना अधिकार आहेत काय ?

३) कीर्दीप्रमाणे रोकड रक्कम बरोबर आहे काय ?

४) ने - आण करताना अणि तिजोरीत ठेवलेल्या शिल्लकेच्या रक्कमेच्या सुरक्षीतते बाबत केलेली व्यवस्था पुरेशी आहे काय?

**ब) बँकेतील शिल्लका :-**

१) बँकेचे पासबुकातील, त्यांनी पाठविलेल्या पत्रातील, बँकेने दिलेल्या- दाखल्यातील शिल्लक रक्कमा संस्थेच्या जमाखर्चाच्या बाक्यांशी जुळतात काय? जर त्या जुळत नसतील तर मेळ पत्रके तपासा.

**क) गुंतवणूकी :-**

१) गुंतवणूक रोखे प्रत्यक्ष पाहा आणि ते संस्थेच्या नावावरच आहेत काय ते पाहा.

२) गुंतवणूकी वरील लाभांश व व्याज यथावत वसूल करण्यात येते काय ते पाहा.

३) जर गुंतवणूक रोखे बँकेत ठेवले असतील तर त्याबाबतचे संबधीत दाखले मिळविले आहेत काय? व ती अद्ययावत लिहीलेली आहे काय ?

४)गुंतवणूक रजिस्टर ठेवण्यात आले आहे काय? व ते अद्ययावत स्वरूपात लिहीलेले आहे काय ?

**(१३) स्थावर आणि जंगम मालमत्ता**

१) संबधीत नोंदवहया ठेवल्या आहेत काय ? व त्या अद्ययावत लिहील्या आहेत काय?

२) मालमत्तेची यादी घेवून प्रत्यक्ष रूजवात घ्या. ताळेबंदातील रक्कमेशी या बाक्या जमतात काय?

३) जमिन आणि स्थावर मालमत्तेच्या बाबत त्याचे विलेख ( दस्तऐवज पाहा)-

व ते संस्थेच्या नावावरच आहेत काय ते पाहा.

४) आवश्यक तेथे मालमत्तेचा अद्ययावत विमा उतरविलेला आहे काय?

५) झीज ( घसारा )

१) घसारा यथावत आकारलेला आहे काय?

२) वेगवेगळया मालमत्तवरील आकारलेले घसा-याचे दर नमुद करा.

(१४) तुम्ही लेखापरीक्षा अहवालाच्या मुद्यांसंबधी संचालक मंडळ/ - व्यवस्थापक समिती यांचेशी चर्चा केली आहे काय ? असल्यास दिनांक नमुद करावा, नसल्यास, त्याची कारणे नमुद करावीत.

**स्थळ:-**

**दिनांक :-**

( सही )

लेखापरिक्षकाचे नाव व पदनाम

नामतालिका क्रमांक --- वर्गवारी---

नमुना क्र.८(अ)

## लेखापरीक्षा अहवाल ( नागरी पत / ग्रामीण बिगरशेती पत सहकारी संस्था)

### विभाग दुसरा

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **ठेवी :-** | | |
| | (१) | संस्था सभासदांकडून ठेवी स्विकारण्याचे नियम तयार केले आहेत काय? त्यांचे काटेकोर पालन केले आहे काय? | |
| | (२) | व्यक्तिगत खात्यावरील बाक्या सर्वसाधारण खतावणीतील एकंदर खात्यांच्या बाकीशी जुळतात काय? | |
| | (३) | ठेवींची देय-काल नोंदवही ठेवली आहे काय? आणि ठेवींची परतफेड वक्तशीरपण करण्यात येत आहे काय? | |
| | (४) | ठेवीपोटी कर्जाऊ रकमा देण्यात येतात तेव्हा पोट-नियम आणि या कारणासाठी तयार केलेले नियम यानुसार त्या काटेकोरपणे दिलेल्या आहेत काय? | |
| | (५) | ठेव खात्यात दाखविलेल्या रकमांवरील व्याजाची आकारणी पडताळून पहा. जर या तपासण्या शेकडेवारी पध्दतीवर केल्या असतील तर त्यांचे शेकडा प्रमाण लिहा. | |
| | (६) | अनुदेय नसतांनाही संस्थेने बिगर सभासदांकडून ठेवी स्विकारल्या आहेत काय? असल्यास अशा बिगर सभासद ठेवींची रक्कम व ठेवीदार संख्या नमुद करा? | |
| (२) | **चल संपत्ती आणि व्यापार :-** | | |
| | (१) | उपविधीनुसार रोख राखीव प्रमाण व वैधानिक तरलता प्रमाण चल संपत्तीची(फ्ल्यूईड रिसोर्सेस ) तरतूद पुरेशी ठेवली आहे काय? | |
| | (२) (अ) | चल संपत्ती दैनंदिन वा साप्ताहिक पध्दतीवर ठेवली आहे ते लिहा. | |
| | (ब) | संस्थेची चल संपत्ती आणि सांपत्तिक स्थिती दर्शविणारी विवरणपत्रे योग्य त्या प्राधिका-याकडे ठराविक दिनांकास पाठविली जातात काय? | |
| | (३) | लेखापरीक्षा काळात भांडवलाच्या तरतुदीत काही कमतरता आढळल्या आहेत काय? असल्यास, सर्वसाधारण अभिप्रायात विचार व्यक्त करा. | |
| | (४) | निबंधकांनी घालून दिलेल्या प्रमाणाशी विचार करता संस्था जादा व्यवहार (ओव्हर ट्रेडिंग) करते काय? असल्यास, जादा झालेल्या व्यवहारांची मर्यादा लिहा. | |
| (३) | **बाहेरील कर्जे :-** | | |
| | (१) | जिल्हा सहकारी बँकेने वा इतर बँकांनी विविध कारणांच्या योजनाखाली दिलेली कर्जे अथवा पतमर्यादा यांच्या रकमा काय आहेत? पुढीलप्रमाणे माहिती लिहा. | |

| अनुक्रमांक | पतमर्यादेचा प्रकार | कारण | मंजुर रक्कम | परतफेडीचा नियत दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

| उचललेली कमाल रक्कम | केलेली परतफेड | येणे बाकी | थकबाकी |
|---|---|---|---|
| ६ | ७ | ८ | ९ |
| | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (२) | संस्थेने मिळविलेल्या विविध कर्जाचा आणि पतमर्यादांचा व्यवहार समाधानकारक आहे काय? | | |
| | (३) | कर्जे वक्तशीरपणे परत केली जातात काय? | | |
| | (४) | कर्जासाठी घालून दिलेल्या विविध शर्तीचे काटेकोरपणे अनुपालन होत आहे काय? | | |
| (४) | **निधी** :- | | | |
| | (१) | अधिनियम, नियम आणि संस्थेच्या उपविधी तरतुदीनुसार नफ्यातून निधी उभारले आहे काय? | | |
| | (२) | नियम -५४ नुसार आवश्यक असल्याप्रमाणे राखीव निधीची संस्थेच्या व्यवसायाबाहेर स्वतंत्र गंुतवणूक केली आहे काय? जर नसेल तर कारणे नमुद करा. | | |
| | (३) | (अ) | कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची संस्था व्यवसायाबाहेर गंुतवणूक केली आहे काय? | |
| | | (ब) | कर्मचा-यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीतून कर्ज रक्कमा दिल्या आहेत काय? | |
| | | (क) | हया कारणास्तवच्या मान्य नियमांनुसार निधी व्यवहार केले आहेत काय? | |
| | | (ड) | संस्थेच्या लेख्यांपासून स्वतंत्र भविष्य निर्वाह निधी लेखे जतन केले आहेत काय? | |
| | (४) | (अ) | धर्मदाय निधी मध्ये किती रक्कम जमा आहे? अधिनियमाच्या कलम ६९ नुसार संघीय संस्थेच्या मान्यतेने हया निधितून धर्मदाय किंवा सहकार हेतूस्तव रक्कमा अदा केल्या आहेत काय? | |
| | | (ब) | अधिनियम, नियम आणि संस्था उपविधी तरतुदींशी विसंगत अधिदाने केली आहेत काय? | |
| | (५) | नियम - ५३ नुसार संस्थेने राज्य संघीय संस्थेची शिक्षण निधी वर्गणी अदा केली आहे काय? त्याकरीता चिन्हांकित व अदा केलेल्या रक्कमेचा तपशिल द्या. | | |
| (५) | **कर्जे आणि आगाऊ दिलेल्या कर्जाऊ रकमा** :- | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (१) | कर्जे आणि आगाऊ दिलेल्या कर्जाऊ रकमा यासाठी सभासदांकडून आलेले अर्ज नियमानुसार आहेत काय? | |
| | (२) | कर्जाच्या अर्जाची नोंदवही ठेवली असून ती अद्ययावत लिहिली आहे काय? | |
| | (३) | पोट-नियमानुसार, विविध प्रकारची कर्जे आणि पोटी द्यावयाच्या कर्जाऊ रकमा यासाठी व्यक्तिगत आणि एकुण काय मर्यादा ठरविल्या आहेत? त्या मर्यादा पाळल्या जातात काय? | |
| | (४) | (अ) सभासदांच्या परतफेडीच्या क्षमतेची योग्य चौकशी करुन त्यांची पत-पात्रता ठरविली आहे काय? | |
| | | (ब) ठरवून दिलेल्या नमुन्यात पत-पात्रता आणि जामीन दायित्व नोंदवही (शुअर्टी लाययाबिलिटी रजिस्टर) ठेवली आहे काय? | |
| | (५) | कायदा, कानू आणि पोट-नियम यांतील तरतुदीनुसार कर्ज काटेकोरपणे दिली गेली आहेत काय? | |
| | (६) | संस्थेने मागणी, वसुली आणि बाकीची नोंदवही योग्यरीतीने ठेवली आहे काय? | |
| | (७) | योग्य चौकशी केल्यानंतर साधार कारणासाठी मुदतवाढी देण्यात येतात काय? अशा मुदतवाढीसाठी आवश्यक तेथे जमीनदारांच्या सम्मतीपत्रासहित अर्ज मिळविले आहेत काय? | |
| | (८) | (अ) सभासदाकडील थकबाक्या वसूल करण्यासाठी काय कारवाई केली आहे ते लिहा. | |
| | | (ब) मागणी आणि येणे बाकी यांच्याशी थकबाकीचे शेकडा प्रमाण काय आहे? | |
| | (९) | संस्थेने करुन घेतेलेले कर्जरोखे, वचनचिठ्ठया आणि अन्य कागदपत्र नियमानुसार आहेत काय? काही उणीवा असल्यास, नमुद करा. | |
| | (१०) | १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायदयाच्या ४९ व्या कलमाप्रमाणे सभासदांकडून त्यांच्या पगारातून व मजुरीतून करारपत्रात मंजुर केलेल्या रकमा संस्थेच्या नावाने कपात करण्याबद्दल नोकरी देणा-यास प्राधिकार देणारी करारपत्रे करुन घेतली आहेत काय? | |
| | (११) | परतफेडी वक्तशीर आहेत काय? संस्थेच्या मागण्या पु-या करण्यासाठी नोकरी देणा-याने वेतन वा मजुरी यातून मासिक कपात नियमितपणे केल्या आहेत काय? | |
| | (१२) | अशी कपात केलेली रक्कम नोकरी देणा-याने संस्थेस वक्तशीरपणे दिली आहे काय? न दिलेली एकुण रक्कम असलयास लिही. अशा रकमा कोणत्या दिनांकापासून थकित आहेत ते लिहा. | |
| | (१३) | पूर्वीच्या कर्जाची परतफेड आणि नवीन कर्ज देणे यांत ठरवून दिलेले कालांतर यथावत पाळले जाते काय? | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (१४) | सभासदांना दिलेल्या पास-पुस्तकातील नोंदी वैयक्तिक खतावण्यातील नोंदीशी तपासून पहा. अशा तपासलेल्या पास-पुस्तकांची संख्या लिहा. | |
| | (१५) | थकलेल्या व्याजाची रक्कम किती आहे? जर ती हिशेबात घेतली असेल तर तिची यथावत तरतुद केली आहे काय? | |
| | (१६) | संस्थेला येणे असेलेली कर्जे तपासा आणि त्यांचे बुडीत आणि संशयित असे वर्गीकरण झाले आहे काय ते पहा. अशा संशयित व बुडीत कर्जासाठी पुरेशी तरतूद केली आहे काय ते तपासा. | |
| | (१७) | संस्थेच्या व्यवस्थापन समितच्या वा संचालक मंडळाच्या सभासदांना आणि संस्थेच्या अधिका-यांना दिलेल्या आणि येणे असलेल्या कर्जाच्या रकमा लिहा. | |

| अनु क्रमांक | कोणाकडून येणे आहे | कर्ज, पतमर्यादा, अतिकाढ(ओव्हर ड्राफ्ट्स) इत्यादीद्वारा दिलेल्या रकमा | | पैकी थकबाकी | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुद्दल | व्याज | मुद्दल | व्याज |
| १ | २ | ३ | | ४ | |
| | | | | | |

| कोणत्या दिनांकापा◌ून थकले ते दिनांक | त्यांचेवर जामीनदारीमुळे आलेले दायित्व | | पैकी थकबाकी | |
|---|---|---|---|---|
| | मुद्दल | व्याज | मुद्दल | व्याज |
| ५ | ६अ | ६ब | ७अ | ७ब |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (१८) | **कालमानानुसार थकबाकीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करा** | | |
| | | (१) | पाच वर्षावरील थकबाकी | रुपये |
| | | (२) | तीन वर्षावरील थकबाकी | रुपये |
| | | (३) | एक वर्षावरील थकबाकी | रुपये |
| | | (४) | एक वर्षाच्या आतिल थकबाकी | रुपये |
| | | | **एकुण** | |
| | (१९) | **तारणानुसार थकबाकीचे वर्गीकरण करा.** | | |
| | | (अ) | जामीनदारांच्या हमीनुसार सुरक्षित आणि चांगली असलेली थकबाकी | रुपये |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | (ब) | विमापत्रान्वये सुरक्षित आणि चांगली असलेली थकबाकी | रुपये |
| | | (क) | अन्य तारणामुळे सुरक्षित आणि चांगली असलेली थकबाकी | रुपये |
| | | | **एकुण** | **रुपये** |
| | | (ड) | असुरक्षित आणि संभाव्य संशयित वा बुडीत ठरणारी थकबाकी | रुपये |
| | (२०) | निबंधकाच्या नामनिर्देशित व्यक्तींकडे (नॉमिनीकडे) प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या, संस्थेजवळ प्रलंबित असलेल्या आणि बजावणीसाठी पाठविलेल्या निवाडयांची (ॲवाड्र्स) संख्या त्यांच्या रकमेसह तपशील देऊन लवाद दाव्यातील प्रकरणात अडकून राहिलेली एकुण रक्कम द्या. | | |
| | (२१) | विविध प्रकारच्या कर्जावर आकारण्यात येणा-या व्याजाचे दर नमुद करा. | | |
| | (२२) | दंडाचे व्याज आकारले जाते काय? पोट-नियमात ठरवून दिले असल्यास दंडाच्या व्याजाचा दर लिहा. | | |
| | (२३) | १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्थांबाबत कायदयाच्या कलम ८१(२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे येण असलेली कर्जे, थकलेल्या रकमा, कोणत्या दिनांकापासून थकल्या ते, त्या वसूल करण्यासाठी केलेली कारवाई इत्यादी दर्शविणारी थकबाकीची यादी मिळवा आणि तपासा. | | |
| (६) | **गुंतवणुकी** :- | | | |
| | (१) | कायदा, कानू व पोट-नियम यांतील तरतुदीनुसार गुंतवणुकी केल्या आहेत काय? | | |
| | (२) | गुंतवणुकीच्या अवमूल्यनासाठी पुरेशी तरतूद केली आहे काय? | | |
| | (३) | संस्थेच्या गुंतवणुकी दर्शविणारी नोंदवही अद्यावत ठेवली आहे काय? गुंतवणुक विभागावरील जबाबदार अधिका-याने तीवर सहया केल्या आहेत काय? | | |
| | (४) | गुंतवणुक नोंदवही संस्थेजवळ असलेल्या रोख्यांशी तपासा. | | |
| | (५) | रोखे जर बँकेमध्ये ठेवले असतील तर बँकांची प्रमाणपत्रे (बँकर्स सर्टिफिकेटस्) मिळविली आहेत काय? | | |
| (७) | **खर्च** :- | | | |
| | (१) | खर्चाची पत्रके संचालक मंडळ व व्यवस्थापन समिती यांच्या मंजुरीसाठी ठेवतात काय? | | |
| | (२) | (अ) | वार्षिक अंदाजपत्रके तयार करुन त्यास | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | संचालक मंडळ वा व्यवस्थापन समिती आणि साधारण सभा यांनी मंजुरी दिली आहे काय? | |
| | | (ब) | झालेला खर्च अंदाजपत्रकाच्या मर्यादेतच आहे काय? नसल्यास, साधारण सभेने पुनर्विनियोजनाला (रीॲप्रोप्रिएशन)मान्यता दिली आहे काय? | |
| | (३) | संस्थेच्या व्यवहाराशी संबंध नसलेल्या खर्चाच्या प्रकरणांची सर्वसाधारण अभिप्रायात नोंद करा. | | |
| | (४) | संस्थेने नगरांतर दुरध्वनी नोंदवही ठेवली आहे काय? खाजगी दुरध्वनीचा खर्च वसूल करण्यात येतो काय? | | |
| | (५) | खेळत्या भांडवलाशी आणि निव्वळ उत्पन्नाशी (मिळालेल्या व्याजातून दिलेले व्याज वजा जाता) व्यवस्थापनाच्या खर्चाचे शेकडा प्रमाण लिहा. | | |
| (८) | **अंतर्गत तपासणी :-** | | | |
| | (१) | संस्थेतील अंतर्गत तपासणीची व्यवस्था समाधानकारक आहे काय? | | |
| | (२) | संस्थेने अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक केली आहे काय? त्यांना दिलेल्या लेखापरीक्षा शुल्काची रक्कम आणि गेल्या लेखापरीक्षणाचा कालखंड लिहा. | | |
| (९) | **व्यवस्थापन :-** | | | |
| | अधिलाभांशाच्या कायदयानुसार कर्मचारी वर्गाला द्यावयाच्या अधिलाभांशाची पुरेशी तरतूद संस्थेने केली आहे काय? | | | |

**स्थळ:-**

**लेखापरीक्षकाची सही व पदनाम**
**नामतालिका क्रमांक--- वर्गवारी**

**दिनांक :-**

## ------------------------------सहकारी पतसंस्थां मर्यादित----------

## लेखापरीक्षण कालावधी- ०१/०४/२०-- ते ३१/०३/२--

प्रास्ताविक-

----------------------सहकारी संस्था मर्या.-------(यानंतर संस्था असा उल्लेख करण्यात येईल) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्थेचा नोंदणी क्रमांक--------दिनांक------आहे. संस्थेच्या मुख्यालया व्यतिरिक्त ------शाखा आहेत. संस्थेच्या दिनांक ०१/०४/२०-- ते ३१/०३/२०-- या कालावधीच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी संस्थेने त्यांचे दिनांक--------रोजी पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक-------अन्वये अथवा निबंधक यांचे---------- आदेशानुसार वैधानिक लेखापरीक्षक म्हणून आमची नियुक्ती केलेली आहे. संस्थेच्या उक्त कालावधीचे लेखापरीक्षण, संस्थेने पुरवलेल्या लेखी दस्तऐवज व तोंडी माहिती व खुलाशाच्या आधारे पूर्ण केलेले आहे. लेखापरीक्षणासाठी आवश्यक असणारे सर्व रेकॉर्ड व माहिती संस्थेने लेखापरीक्षणावेळी आम्हास उपलब्ध करून दिलेले आहे. लेखापरीक्षण कालावधीत संस्थेचे चेअरमन म्हणून श्री----------------यांनी व व्हाईस चेअरमन म्हणून श्री.-----------यांनी कामकाज केले आहे. तसेच संस्थेचे मॅनेजर/मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री------ --यांनी कामकाज केलेले आहे.

## भाग अ

**(लेखापरीक्षण कालावधीत अपहार, गैरव्यवहार, निधीचा गैर विनियोग, आर्थिक अनियमितता इत्यादीच्या अनुषंगाने निदर्शनास आलेले गंभीर दोष खालील प्रमाणे)**

**अ) गैरव्यवहार, अफरातफर, फसवणुक, बनावट कागदपत्रांव्दारे निदर्शनास आलेला अपहार:-**

लेखापरीक्षणावेळी गैरव्यवहार/अपहार निदर्शनास आला असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ८१(५) ब मधील तरतुदीनुसार व सहकार आयुक्त व निबंध्क, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाने **दि.२२/०९/२०२१** रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील सुचनेनुसार विनिर्दिष्ट अहवाल विहित मुदतीत सादर करावा.

भारतीय दंडविधान, १८६० (Indian Penal Code) मधील तरतुदीनुसार गैरव्यवहार /अपहाराबाबत खालील कलमे व गुन्हे प्रकार समाविष्ट आहेत.

१ **चोरी** (Theft) (३७८/३८१)- संस्थेच्या मालमत्तेच्या अभिरक्षणची जबाबदारी असलेल्या व्यक्तीने अप्रामाणिकपणे संस्था संपत्तीची चोरी करणे किंवा स्वत:साठी वापरणे.

२ **अफरातफर** (Criminal Misappropriation) (४०३) - अप्रामाणिकपणे संस्थेच्या मालमत्तेची संस्था मालकीच्या संपत्तीची चोरी करणे किंवा स्वत:साठी वापरणे.

३ **विश्वासघात** (Criminal Breach of Trust) (४०५/४०८/४०९) - संस्थेचा विश्वासघात करुन संस्थेची संपत्ती लाटणे.

४ **फसवणुक** (Cheating / Fruad) (४१५/४१६/४१९/४२०) - संस्थेची फसवणुक करुन संस्था मालमत्ता हडपणे वा लपविणे वा तोतयागिरीने फसवणुक करणे.

५ **बनावट कागदपत्रे** (Forgery) ( ४२४/४२५/४६३/४६४/४६७/४६८/४७०/ ४७१/ ४७०) - खोटी / बनावट कागदपत्रे खरी भासवुन संस्था रक्कमा हडप करणे

६ **गैरवापर (Misapplication)** - स्वार्थासाठी, संस्थेच्या संपत्तीच्या प्राप्त अधिकारांचा गैरवापर करणे.

७ **कट (३४ / १२०) (Criminal Conspiracy)** - दोन पेक्षा अधिक समाने हेतुने गुन्ह्यांत सामिल व संपत्ती हडप करतात.

८ **अधिकाराचा गैरवापर** - सांभाळण्यासाठी दिलेल्या संस्थेचा गैरवापर करणे.

९ **गैरवर्तणुक (Misfisance)** - दिशाभुल करुन चुकीचे बेकायदेशीर निर्णय घेऊन संस्था मालमत्ता हडपणे.

१० **बनावट लेखांकन (Fasification of Accounts)** - संस्था हिशोबाच्या नोंदवह्यांत खोट्या नोंदी घेऊन रक्कम हडप करणे व दिशाभुल करणे.

**ब) संस्थेचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत:-**

उक्त नमुद केल्यानुसार संस्थेत लेखापरिक्षण कालावधीत गैरव्यवहार/ अपहार निदर्शनास आला असल्यास सदर रक्कमेची जबाबदारी निश्चित होऊन रक्कम वसुल होण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ८१(५ब) मधील तरतुदीनुसार विशेष अहवाल सादर करणे क्रमप्राप्त आहे.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व त्याखालील नियमांमधील तरतुदीनुसार लेखापरिक्षणामध्ये संस्थेचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास येत असल्यास सदर रक्कमेची जबाबदारी निश्चित होऊन रक्कम वसुल होण्यासाठी विशेष अहवाल सादर करण्यात यावा. सर्वसाधारणपणे खालिल नमुद कलमांच्या व नियमांच्या उल्लंघनामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास येते.

१ कलम ६४- संस्थेने लाभांश / अधिलाभांश (Bonus) वगळता उपविधी तरतुदीशिवाय अन्य प्रकारे निधी लाभ घेतला असल्यास,

२ कलम ६७ - संस्थेने निबंधकाच्या पुर्व मान्यतेशिवाय कमाल १५ टक्के पेक्षा जास्त लाभांश दिला आसल्यास,

३ कलम ६९ - संस्थेने राखिव निधी वजा जाता उर्वरीत नफ्याच्या कमाल २० टक्के पेक्षा जास्त नफा सहकार / धर्मदाय हेतुने वापरला असल्यास,

४ कलम ७१ ए -कलम ७८, ७८ ए किंवा ९६ नुसार संस्था अधिक-याच्या व्यक्तीगत क्षमतेत दाखल दाव्यांचा खर्च संस्था निधीतुन केला असल्यास,

५ नियम ४९ - संस्थेने बुडीत कर्जे व तोटे बुडीत कर्ज निधी / राखिव निधी / भागभांडवलातुन निर्लेखन सर्वसाधारण सभा विषय पत्रिकेवर विषयासह पुर्व मंजुरी न घेता केले असल्यास,

६ नियम ४९ - संस्थेने बुडीत कर्जे / मत्ता लेखापरीक्षकाचे प्रमाणपत्र न घेता निर्लेखित केले असल्यास,

७ नियम ४९ - संस्था मध्यवर्ती बँक कर्जदार असल्यास बँक व "क" / "ड" लेखा परीक्षण वर्गवारी असुनही निबंधक यांची पुर्वानुमती न घेता संस्थेने बुडीत कर्जे / मत्ता निर्लेखित केली असल्यास,

८ नियम ६९ (६) नुसार अनुसुची (एक) :- सहकार कायदा, नियम व उपविधी उल्लंघन करुन केल्ले खर्च केले असल्यास,

९ नियम ६९ (६) नुसार अनुसुची (तीन) :- समितीच्या गैरकामकाजामुळे बुडित व संशयित वाटणारी मालमत्ता वा कर्जे असल्यास,

१० नियम ६९ (६) नुसार अनुसुची (चार) :- संस्थेच्या खर्चात व संस्थेस येणे असलेल्या रक्कमांच्या वसुलीत आढळलेले अनोचित्य वा अनियमितता असल्यास,

११ नियम १०७ ए नुसार संस्थेने प्रवास दैनिक भत्ता व समिती सदस्य सभा शुल्क जादा अदा केले असल्यास,

१२ नियम १०७ सी - कमाल रोख शिल्लक मर्यादा उल्लंघन केले असल्यास,

१३ उपविधीतील कर्ज नियमानुसार संस्थेने मर्यादाबाह्य विनातारणं/असुरक्षित कर्जे मंजुर करुन अदा केल्याने ती थकीत झाले असल्यास,

**क) अन्य महत्वाच्या व गंभीर बाबी ज्या निबंधकाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे.**

यामध्ये सर्वसाधारणपणे सहकार कायदा / नियम व मंजुर उपविधी तरतुदींचे संस्थेने उल्लंघन केल्याने संचालक मंडळातील सदस्य त्यांचे पदावर राहण्यास अनर्ह ठरत असल्यास तसेच खालिलप्रमाणे इतर उल्लंघन असल्यास तसा तपशील नमुद करावा. उदा.

१ कलम ६५ - संस्थेने नियमा नुसार वार्षिक आर्थिक पत्रक तयार करुन निव्वळ नफा निश्चिती केली नाही.

२ कलम ६५ – संस्थेने कायदा / नियम / उपविधी नुसार वार्षिक सर्वसाधारण सभा मान्यतेने नफा विभाजन केले नाही.

३ कलम ६८- संस्थेने आर्थिक वर्ष समाप्ती पासुन ३ महिन्याच्या आंत राज्य संघीय संस्थेस शिक्षण निधी वर्गणी अदा केली नाही.

४ कलम ७१ ए, कलम ७८, ७८ ए किंवा ९६ नुसार संस्था अधिका-याच्या व्यक्तीगत क्षमतेत दाखल दाव्यांचा खर्च संस्था निधीतुन केला.

५ कलम ७३ सीए – संस्था समिती वर कलम ७३ सीए नुसार अपात्र समिती सदस्य असल्यास.

६ कलम ७३ सीबी – संस्था समिती निवडणुक पात्र / पदरिक्त.

७ कलम ७५- संस्थेने आर्थिक वर्ष समाप्तीपासुन ४ महिन्यांत लेखा परीक्षण केले नाही.

८ कलम ७५- संस्थेने आर्थिक वर्ष समाप्तीपासुन ६ महिन्यांत वार्षिक सर्वसाधारण सभा घेतली नाही.

९ कलम ७५ (२) व (२ए) – संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेत नामतालिकेवरील पात्र लेखा परीक्षक नियुक्ती व त्याची लेखी संमत्तीचे विवरणपत्र दाखल केले नाही.

१० कलम ७५ (४) - संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखा परीक्षण अहवालासह लेखा परीक्षीत आर्थिक पत्रके सादर केले नाही.

११ कलम ७९ (१) - संस्थेने कलम ७९ निर्देश आदेशात नमुद मुदतीत संस्था दप्तर लेखा परीक्षणास दिले नाही.

१२ कलम ७९ (२) - संस्थेने आर्थिक वर्ष समाप्तीपासुन ६ महिन्यांत विहीत विवरणपत्रे निबंधकांस सादर केली नाही.

१३ कलम ८१ (३) (ए) नुसार संस्थेचे लेखा परीक्षणासाठी अत्यंत आवश्यक असलेले महतवाचे काही दप्तर लेखा परीक्षकांना उपलब्ध करुन दिले नाही.

१४ नियम २३ च्या स्पष्टीकरणानुसार संस्थेचे अहवाल कालावधी अखेरचे नक्त मुल्य दर्शनी मुल्या पेक्षा कमी आहे.

१५ नियम ३५ नुसार संस्थेने मर्यादाबाह्य कर्ज व ठेवी उभारणी केली आहे.

१६ नियम ४२ नुसार कर्जदार व जामिनदार संस्था सभासद नाही. तसेच सहकार नियम व उप विधी नुसार कर्ज वाटप मर्यादा, अटी व शर्ती भंग केला आहे.

१७ नियम ४५ नुसार एका पेक्षा जास्त पत संस्थेतुन कर्जे घेण्यास प्रतिबंध ( नमुना – "के") असुनही संस्थेने अपात्र कर्जदारास कर्ज मंजुर व अदा केल्यास.

१८ नियम ४६ नुसार कर्ज मंजुरी अटी भंग होऊनही १ हप्ता नोटीस देऊन समितीने कर्जदारा कडुन येणे सर्व कर्ज रक्कम एकरकमी परत मागितली नाही.

१९ नियम ४९ ए नुसार संस्थेने व्याज देय, शुल्क, कार्यालयीन खर्च, वेतन व भत्ते, वीज, दुरध्वनी, भाडे, कर देयता, वर्गण्या, बुडित व संशयित कर्ज निधी, थकीत कर्ज व्याज निधी, गुंतवणुक चढ – उतार निधी, कर्मचारी निधी, भाग भांडवल विमोचन निधी, इ. तरतुदी परिपुर्ण करुन नफा निश्चिती केली नाही.

२० नियम ४९ सी नुसार पत संस्थेने तरतुदी, रोख / वेधानिक तरलता प्रमाण, पत / ठेवी प्रमाण, इतर निकषांचे आदर्श प्रमाण पालन केले नाही.

२१ नियम ६१ नुसार संस्थेने वार्षिक आर्थिक पत्रके ४५ दिवसांत तयार केली नाही.

२२ संस्थेने नियम ६९ (४) (iv) नुसार लेखापरीक्षकाने संस्थेने शासनाने किंवा ICAI ने विहीत केलेल्या "लेखांकन मानकानुसार" (Accounting Standards) लेखांकन केले नाही.

२३ नियम ६९ (६) नुसार अनुसुची (दोन) प्रमाणे संस्थेने ज्या रक्कमा हिशोबात घेणे आवश्यक होते पण घेतल्या नाही.

२४ उपविधी क्र. १८ अ नुसार संस्था बिगर सभासदांकडुन ठेवी स्वीकारते व टी.डी.एस. वजावट करीत नाही.

२५ उपविधी क्र. २० नुसार संस्थेने सर्व सभासदांचा मान्य फोटो व पत्ता पुरावा प्राप्त करुन के.वाय.सी. पुर्तता केली नाही.

२६ उपविधी क्र. ३८ नुसार सचिव / व्यवस्थापक ह्यांनी सभेची वृत्तांते मुदतीत परिपुर्ण लिहुन त्यावर संस्था अध्यक्षांची सही घेतली नाही

२७ उपविधी क्र. ४९ नुसार संस्थेने तक्रार निवारण व तडजोड समिती स्थापन करणे आवश्यक असुनही केली नाही.

२८ उपविधी क्र. ५३ नुसार संस्था कमाल कर्ज मर्यादांचे उल्लंघन करुन कर्जे मंजुर करते. कर्जदाराच्या वेतन चिठ्ठीत नमुद कर्ज कपाती नुसार योग्य नमुना "के" व "ना हरकत पत्र" न घेता अयोग्य प्रकारे कर्जे मंजुर करते.

२९ उपविधी क्र. ७ नुसार संस्थेने निबंधक मान्यतेने अधिकृत भागभांडवल वाढवुन न घेता जादा भागभांडवल उभारले आहे.

३० उपविधी क्र. ४५ (११) नुसार सतत ३ संचालक मंडळ सभा गेरहजर संचालकाचे "संचालक" पद संपुष्टात आणण्याची कार्यवाही संस्थेने केली नाही.

३१ उपविधी क्र. ३ (२४) व ई (३९) नुसार संस्था संचालक मंडळाने तज्ञ व अनुभवी व्यक्तीची "तज्ञ संचालक" म्हणुन निवड केली नाही.

(सही)
लेखापरिक्षकाचे नाव व पदनाम
नामतालिका क्रमांक----- वर्गवारी

## भाग "ब"

### अ व्यवस्थापन विभाग :-

**१. संस्था नोंदणी क्रमांक व दिनांक :-**

संस्थेचा नोंदणी क्रमांक-------/ एसआरआर/आरएसआर/सीआर/----/ दिनांक ------------- असा आहे. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र दप्तरी आहे.

**२. संस्था कार्यक्षेत्र :-**

संस्थेचे उपविधिनुसार कार्यक्षेत्र ----------- पुरते मर्यादित आहे. (अहवाल कालावधीत कार्यक्षेत्रात बदल झाला असल्यास तसे निबंधक यांच्या आदेश क्रमांक व दिनांकासह नमूद करावे.)

**३. संस्थेचे मुख्य कार्यालय व शाखा :-**

संस्थेचे मुख्यालया व्यतिरिक्त --- शाखा असुन

**४. संस्थेचे उददेश :-**

संस्थेच्या प्रमुख उददेशांत सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकाराचा प्रसार करण्यास प्रोत्साहन देणे, भागभांडवल स्विकारणे, सभासदांना कर्ज देणे व त्यांची वसूली करणे, बाहेरील कर्ज काढणे किंवा निधि उभारणे, संस्थेच्या उपयोगासाठी मालकी हक्काने किंवा भाडयाने जागा किंवा इमारत खरेदी करणे, सभासदांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी विविध उपक्रम हाती घेणे. उपरोक्त सर्व किंवा एखादा उददेश साधण्यासाठी लागणारी अनुषंगीक सर्व कामे करणे.

संस्थेने उपविधितील उददेशा व्यातिरिक्त तसेच कलम १४४ मधील सुधारणा लक्षात घेता कामकाज केले आहे/नाही.

**५. सभासदत्व :-**

दि.--------- (गतवर्ष) अखेर सभासद संख्या ------ होती. लेखापरीक्षण मुदतीत नवीन ----- सभासद झाले असून ---- सभासदांनी राजीनामे दिले आहेत. दि. ------ अखेर एकूण सभासद संख्या ------ इतकी असून यादीप्रमाणे ती बरोबर आहे/ नाही. सभासद वाढीचे प्रमाण ------ % आहे. सभासद "आय" व "जे" नमुना रजिस्टर संगणकीकृत ठेवलेले आहे/ नाही. आय नमुन्यात वारसदारांचा उल्लेख केलेला आहे/ नाही. उपविधित नमूद केलेल्या निकषांप्रमाणे क्रियाशिल व अक्रियाशिल सभासदांची स्वतंत्र यादी "जे -१ व जे-२" नमुन्यात केलेली आहे / नाही. तशी यादी तयार करुन अक्रियाशील सभासदांना मुदतीत सुचित करण्यात आले आहे/ नाही. नवीन सभासदांचे अर्ज व राजीनामे अर्ज दप्तरी आहे / नाही. सभासदांना भाग दाखल्याचे वाटप केले आहे/ नाही. तसेच त्याचे भाग रजिस्टर ठेवलेले आहे/ नाही. सर्व सभासदांची केवायसी पूर्तता केली आहे/ नाही. लेखापरीक्षण कालावधीत कार्यक्षेत्राबाहेरील व्यक्तिंना सभासद केलेले आहे/ नाही. इ. मुद्द्याना अनुसरुन अभिप्राय द्यावेत.

**६ सभा कामकाज**

**१ संचालक मंडळ सभा :-**

लेखापरीक्षण मुदतीत संचालक मंडळाच्या एकूण ------ सभा झालेल्या आहेत. संस्थेच्या पोटनियम क्रमांक ------ नुसार संचालक मंडळाचे दरमहा एक सभा घेणे आवश्यक आहे. सदर सभांमध्ये नियमित कामकाज घेण्यात आलेले आहे / नाही.

**अ) सर्वसाधारण दोष**

१ पोटनियमानूसार सभा घेण्यात आलेल्या आहेत/ नाहीत.

२ मासिक खर्चास मंजूरी आहे/ नाही.

३ सभासद कर्ज अर्जांना मंजूरी आहे/नाही.

४ नवीन सभासद अर्ज व राजीनामे अर्जास मंजूरी आहे/ नाही..

५ संचालक मंडळ सभा इतिवृत्त पूर्ण केल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष यांनी मंजूरीबाबत सहया केल्या आहेत / नाहीत.

(वर नमूद व्यतिरिक्त इतर काही मुददे / दोष असल्यास लेखापरीक्षकांनी ते नमूद करावेत.)

**ब) सभेचे इतिवृत्त तपासताना खालील दोष निदर्शनास आले.**

| अ. क्र. | सभा दिनाक | विषय क्रमांक व ठराव क्रमांक | विषय | केलेल्या ठरावाचा संक्षिप्त तपशिल | केलेल्या ठरावास अनुसरुन आक्षेप |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

**२. उपसमिती सभा -**

संस्थेने उपविधितील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे उपसमित्या गठण केलेल्या असून लेखापरीक्षण कालावधित खाली नमूद केल्याप्रमाणे सभा झालेल्या आहेत. (उपविधितील तरतुदीनुसार उपसमित्या स्थापन केलेल्या नसल्यास तसे नमूद करावे.)

१ कर्ज उपसमिती एकूण सभा -----

२ गुंतवणूक उपसमिती एकूण सभा -----

३ लेखापरीक्षण उपसमिती एकूण सभा -----

४ अन्य

**सदर सभांचे इतिवृत्त तपासताना खालील दोष निदर्शनास आले.**

| अ. क्र. | उपसमिती सभा दिनाक | विषय क्रमांक व ठराव क्रमांक | विषय | केलेल्या ठरावाचा संक्षिप्त तपशिल | केलेल्या ठरावास अनुसरुन आक्षेप |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

सदर सभांचे इतिवृत्त संचालक मंडळाच्या सभेत कायम केलेले आहे / नाही.

**३. वार्षिक सर्वसाधारण सभा**

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. --/--/२०-- रोजी ------ या ठिकाणी पार पडलेली असून सदर सभेस ------- सभासद उपस्थित होते.

सभेचे इतिवृत्त तपासताना निदर्शनास आलेले सर्वसाधारण दोष पुढीलप्रमाणे :-

१ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस १४ दिवस अगोदर विहित मुदतीत काढण्यात आलेली आहे/नाही.

२ सभेची नोटिस सभासदांना विहीत वेळेत प्राप्त झाली किंवा कसे?

३ महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७५ (२)(७) व पोटनियम क्र. ------------ नुसार दोष दुरुस्ती अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेत ठेवलेला नाही.

४ पोटनियम क्र. ------------ नुसार व्यवस्थापन समितीने वार्षिक अंदाजपत्रक बनवून त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली आहे/नाही.

५ महाराष्ट्र सहकारी संस्था कलम ७५(२)(अ) अन्वये शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधून कलम ८१ व नियम ६९ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे किमान आर्हता व अनुभव असलेल्या पात्र लेखापरीक्षकांची किंवा लेखापरीक्षण करणा-या संस्थेची चालू वित्तीय संस्थेची नेमणूक केली किवा नाही.

